दिनांक :- ३०/०५/२००९

**सन्माननीय बंधू भगिनींनो,**

अखिल भारतीय मराठी साहित्य परिषेदेने आयोजित केलेल्या १६व्या अखिल भारतीय नवोदित मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद आपण मला दिलेत, त्याबद्दल आयोजकांचे, परिषदेच्या पदाधिका-यांचे मनःपूर्वक आभार मानतो.

माझ्याकडून जे थोडेफार बरे लेखन झालेले आहे, त्या संदर्भात आपण हा मला दिलेला प्रतिसाद आहे, असे मी समजतो. आज महाराष्ट्रामध्ये वेगवेगळया प्रकारची विभागीय साहित्य संमेलने आयोजित केली जातात. काही संमेलने ही प्रादेशिक पातळीवरची किंवा जिल्हा पातळीवरची असतात. अशा छोटया छोटया संमेलनांमधून जो विचार समोर येतो, तो माझ्या दृष्टीने महत्वाचा आहे. त्या त्या प्रदेशातील युवकांना आणि जाणकारांना त्यात सहभागी होण्याची संधी मिळते आणि आपले विचार व्यक्त करता येतात. या दृष्टीने नवोदित लेखकाची जडण-घडण होणे, त्याचा आत्मविश्वास वाढीस लागणे, या गोष्टी होत असतात. म्हणून संमेलने आपल्याला दूर्लक्षित करता येत नाहीत. नवदितांचे हे संमेलन असले तरी मी रूढ अर्थाने नवोदित नाही. परंतु या संमेलनात नवोदित आणि जाणकार साहित्यिकांसोबत चर्चा करण्याची ही एक चांगली संधी मला मिळालेली आहे. या निमित्ताने तरुण आणि नवोदित लेखकांशी संवाद साधून विचार विनिमय करुन त्यांच्या भावना जाणून घेता येतील. नव्या पिढीने काय लिहिले आहे, किंवा नवी पिढी कोणत्या पध्दतीने विचार करते आहे, हे मागच्या पिढीतील बूजुर्गांनी जाणून घेणे गरजेचे आहे, असे मला वाटते. मागील पिढीला नवोदितांची दिशा समजू शकते आणि नवोदितांना मागील पिढयांचा विचार आणि समृध्द परंपरा या संबंधी चिंतन करता येते. नवोदितांचे हे संमेलन या दृष्टीने मला महत्वाचे आहे.

मित्रहो, अभिव्यक्त होणे, ही माणसाची महत्वाची गरज आहे. माणसे आपआपल्या पध्दतीने अभिव्यक्त होत असतात. परंतु साहित्यातून जेव्हा तो अभिव्यक्त होत असतो, तेव्हा त्यांच्या व्यक्तिमत्वातील सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक कंगोरेही व्यक्त होतात. म्हणजे एका अर्थाने साहित्यिक हा सामाजिक, सांस्कृतिक बाजू समोर आणत असतो. साहित्यिक हा त्याच्या समकालीन जीवनाचा भाष्यकार असतो. तो एका अर्थाने जीवनाचा चिंतक असतो. त्याच्या अनुभवाची व्यामिश्रता आणि सामाजिक प्रश्नांची गुंतागुंत आपल्या साहित्यकृतीतून तो अभिव्यक्त करीत असतो. अस्सल साहित्य हे अंतःप्रेरणेतून स्फुरत असते आणि लेखकाचे हे स्फुरण अटळ आणि अनिवार्य असते. सांगण्याची उर्मी नैसर्गिकपणे दाटून येणे आणि त्या उर्मीने आपला स्वतःचा फॉर्म शोधणे, ही अत्यंत स्वाभाविक गोष्ट असते. ख-या साहित्यकृतीला नटवावे लागत नाही. खरी साहित्यकृती कारागिरीतून निर्माण होत नाही, तर स्वाभाविकपणेच खरी साहित्यकृती कलात्मकता धारण करीत असते. कलात्मकता आणि जीवन याचा अतूट असा संबंध असतो. कोणतीही श्रेष्ठ साहित्यकृती ही अंतिमतः मानवी जीवनासंबंधिच बोलत असते आणि हे साहित्याचे महत्वाचे मूलभूत वैशिष्टय आहे. आज ग्रामीण भागातील लेखक अतिशय सजगपणे लिहित आहेत. ग्रामीण भागातील हा लेखक वेगवेगळया सामाजिक स्तरातून आलेला आहे. भारतीय समाजवास्तव जर आपण बारकाईने निरखून पाहिले तर आपल्या लक्षात येईल की, या समाज- वास्तवामध्ये खूप वेगवेगळे अंतःस्तर

आहेत आणि हे अंतःस्तर जात, धर्म, पंथ, लिंग अशा अनेक गोष्टींच्या संदर्भात आपल्याला विचारात घ्यावे लागतात. शोषक आणि शोषित असा संघर्ष तर अंतःस्तरामध्ये दिसतोच. पण मानवी मूल्यांची प्रतिष्ठापना करण्यासाठी करावा लागणारा संघर्ष हा देखील अंतःस्तराच्या संदर्भात महत्वाचा ठरतो. आपल्याकडे विशेषतः महाराष्ट्रात थोर क्रांतिकारकांची परंपरा आहे. छत्रपती शिवाजी महाराज, ज्योतीराव फुले, राजश्री शाहू महाराज, बाबासाहेब आंबेडकर, विठ्ठल रामजी शिंदे, संत गाडगे महाराज या क्रांतिकारकांचे विचार आपल्याला सातत्याने मार्गदर्शन करीत असतात. बदलत्या काळामध्ये या विचारांच्या कसोटीला माणूस म्हणून आणि साहित्यिक म्हणून आपल्याला उतरावे लागेल. मघाशी म्हटल्याप्रमाणे आज नव्या पिढीतील ग्रामीण भागातील लेखक जे लिहीत आहेत, त्याकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही. सदानंद देशमुख, कृष्णात खोत, अशोक पवार, आसाराम लोमटे या सारखी अनेक नावे आपल्याला सांगता येतील. बदलत्या संस्कृतीप्रमाणे जातव्यवस्था बदलत चालली आहे. जातीव्यवस्थेचा नामशेष होण्यापेक्षा बदलण्याकडे अधिक कल असतो. जातीचे अस्तित्व संपुष्टात येत नाही. मात्र त्याचे स्वरुप बदलते. जसे समुद्रातील ऑक्टोपस या प्राण्याचे तोंड कोणते आहे, हे लवकर कळत नाही आणि तो परिस्थितीप्रमाणे अत्यंत लवचिकपणे बदलतो, तसे काहीसे जातीव्यवस्थेचे झालेले आहे. नव्या पिढीतील लेखकांनी या संबंधी चिंतन करुन समाजव्यवस्था आणि त्यातील उभे, आडवे तणाव आणि त्याची गुंतागुंत निर्भिडपणे साहित्यातून मांडणे गरजेचे आहे. नव्या बदलत्या काळाची ही मागणी आहे, जेव्हा जेव्हा भारतीय समाज व्यवस्थेतील कष्टकरी, दलित शोषित अभावग्रत समाज बोलू आणि लिहू लागला तेव्हा तेव्हा समाजातील अनेक क्षेत्रांमध्ये आपल्याला बदल दिसू लागला आहे. सन १९६० नंतरच्या काळात निर्माण झालेल्या दलित साहित्य आणि ग्रामीण साहित्य प्रवाहाने आपली पृथगात्मता सिध्द केली. सन १९८० च्या काळात स्त्रीवादी साहित्याची चळवळ सुरु झाली. या सगळया चळवळी आपोआप निर्माण झालेल्या नसून त्यामागे एक ठळक मूलभूत परिवर्तनवादी विचार आहे आणि त्या विचारांचे वहन करणा-या या चळवळी आहेत. कोणत्याही वाङ्मयीन चळवळीचा वैचारिक पाया हा जर भक्कम असेल, तर ती चळवळ दिशादर्शक ठरु शकते. मुख्य प्रवाहाला कवेत घेण्याचे तिच्यात सामर्थ्य निर्माण होते. दलित साहित्य चळवळीनी हे सिध्द केले आहे. साहित्यातील हे वेगवेगळे प्रवाह आपले आगळे वेगळे वैशिष्टय राखून आहेत. मात्र या चळवळी म्हणजे सवतासुभा नव्हेत. साहित्यातील प्रवाह ही संकल्पना चर्चेसाठी, अभ्यासासाठी, त्याचा वेगळेपणा सिध्द करण्यासाठी आवश्यक असते. मात्र मूलतः साहित्य प्रवाह म्हणजे मराठी साहित्य असते, हे विसरुन चालणार नाही. मघाशी म्हंटल्याप्रमाणे शोषित आणि अभावग्रस्त समाज क्रियाशील झाला की, समाजमनात स्थित्यंतरे निर्माण होतात. आज भटक्या विमुक्त आणि उपेक्षित समूहातील काही वर्ग लिहू, बोलू लागला आहे. आपआपल्या परीने तो साहित्यातून आपल्या जीवनानुभवाची अभिव्यक्ती करु लागला आहे. तथापि, आजही खूप मोठा वर्ग हा साहित्य क्षेत्रापासून दूर आहे. शोषित आणि उपेक्षित समाजातील स्त्रिया मोठया संख्येने लिहू लागतील, तेव्हा ख-या अर्थाने साहित्य समृध्द होईल. कष्टकरी आणि वंचित समुहातील तरुण लेखकाचे अनुभवदेखील याचदृष्टीने महत्वाचे ठरणार आहेत. म्हणून अजूनही दलित साहित्याला, पर्यायाने मराठी साहित्याला दीर्घ पल्ल्याची साहित्य- निर्मिती करावी लागणार आहे आणि पुढच्या पाव शतकात हे चित्र बरेचसे स्पष्ट होणार आहे. मराठी साहित्य वेगवेगळया अंगाने, वेगवेगळया जीवनानुभवाने समृध्द होऊ पहात असताना एक मनात येते की, या साहित्याची चर्चा आणि चिकित्सा आज उमदेपणाने आणि निरपेक्षपणे होणे गरजेचे

आहे. मात्र तसे ते होत नाही. मराठीतील समिक्षाव्यवहार हा निरपेक्ष असा मानता येत नाही. आपआपल्या वर्तुळात आणि हितसंबंधात हे व्यवहार अडकलेले आहेत आणि त्याला कारण आपले समाजजीवन आहे. प्रत्यक्ष आपल्या समाजजीवनात असे हितसंबंध आणि अंर्तद्वंद आहे. त्यामुळेच साहित्य क्षेत्रातही हे दिसून येते. मात्र याला सन्माननीय अपवाद आहे आणि असे अपवाद सगळीकडेच असतात. सध्या मराठी साहित्यात काही नवी नियतकालिके प्रसिध्द होत आहेत आणि ब-या पैकी कामगिरी करताहेत, हे आशादायी असे चित्र आहे. नव्या पिढीला या नियतकालिकातून लिहिण्याची एक संधी उपलब्ध झालेली आहे. मराठीमध्ये नियतकालिकांची समृध्द परंपरा आहे. हे मान्य केले तरी अलिकडच्या काळात काही प्रस्थापित नियतकालिकांची झालेली पडझड आणि नवीन नियतकालिकांचा उदय, या गोष्टींची नोंद करणे महत्वाचे आहे.

'ऐवजी', 'खेळ', 'नवाक्षर, दर्शन', 'परिवर्तनाचा वाटसरु' 'अनाघ्रात' 'साक्षात' 'उर्मी' 'इत्यादी' 'शब्दालय' 'सर्वधारा', अशी अनेक नियतकालिके ही कोंडी फोडू पहात आहे आणि ही आनंदाची गोष्ट आहे. या नियतकालिकातून प्रसिध्द होणा-या कथा, कविता, समीक्षा, वाङ्‌मयीन वाद आणि चर्चा नव्या पिढीला मार्गदर्शक ठरु शकेल एवढा आशावाद या नियतकालिकांनी निर्माण केलेला आहे.

मित्रहो, नवोदित मराठी साहित्य संमेलनात अनेक विषयांवर चर्चा होत आहे. मराठी साहित्यात प्रतिबिंबीत झालेले समाजपरिवर्तन हे कशाप्रकारचे आहे, त्याची बलस्थाने आणि मर्यादा या संबंधी चर्चा अपेक्षित आहे. साहित्याने मला काय दिले, या संबंधी देखील आपण उहापोह करणार आहोत आणि त्याचबरोबर प्रादेशिक बोली भाषेचे मराठी भाषा समृध्दीतील योगदान याबाबतही आपण चिंतन करणार आहोत. हे सर्व विषय एका अर्थाने समकालीन आहेत आणि समकालीन प्रश्नांना भिडणारे साहित्य हे समाजाची वर्तमान स्थिती अधोरेखित करीत असते. ललित साहित्यातून होणारा हा आविष्कार असला तरी एका अर्थाने श्रेष्ठ साहित्य हे सामाजिक दस्ताऐवज असते. भारतीय समाजामध्ये आणि महाराष्ट्रातील समाजजीवनामध्ये सातत्याने समाज- परिवर्तन दिसत असले तरी मराठी लेखक या परिवर्तनासंबंधी किती जागरुक आहे, हे शोधणे गरजेचे आहे. परिवर्तनाच्या चळवळीतून आलेला लेखक हा परिवर्तनाची भूमिका मांडतो, हे तर स्वाभाविक म्हटले पाहिजे. पण उर्वरित समाज या लेखकाला कसा प्रतिसाद देतो आणि समाजातील प्रस्थापित वर्ग हा सर्व गोष्टीं कशा पध्दतीने पाहतो, ते आपल्याला दुर्लक्षित करता येणार नाही. सामाजिक परिवर्तनाची गती ही अतिशय मंद असते, हे मान्य करुनही या गतीमध्ये अडथळे निर्माण करणा-या व्यक्ती आणि समूहांची विचारांच्या पातळीवर चिकित्सा झाली पाहिजे. विधायक समाजपरिवर्तन हे समाजाला पुढे नेत असते आणि या परिवर्तनाला लेखकाचा हातभार लागणे, हे अतिशय गरजेचे असते. लेखकाच्या साहित्य कृतीमुळे झटक्यात समाजाचे परिवर्तन होईल, असे समजणे म्हणजे एक भ्रम आहे. मात्र परिवर्तनवादी लेखकाच्या साहित्यामुळे समाजाची मानसिकता बदलण्यास थोडाफार हातभार लागतो, हे नाकबूल करता येणार नाही. साहित्य ही कला इतर अनेक कलांहून वेगळी आहे, असे आपण मानतो आणि ते एका अर्थाने खरेही आहे. भाषा हे साहित्याचे माध्यम आहे आणि जीवनानुभव हे साहित्याचे आशयद्रव्य आहे. साहित्य निर्मिती हे व्यक्तिसापेक्ष असते आणि हे तिचे मोठेच वैशिष्टय आहे. पण साहित्याचे वाचन, मनन आणि चिंतन यामुळे माणसाचे मन समृध्द होते. त्याच्या जीवनविषयक दृष्टीकोनाला एक खोली प्राप्त होते. जीवन समजून घेण्यासाठी साहित्याचे वाचन हे अतिशय महत्वाचे ठरते. जीवनाच्या

वेगवेगळया क्षेत्रात कामे करणा-या अनेक व्यक्ती हया साहित्य वाचनामुळे समृध्द झालेल्या आहेत, अशीही उदाहरणे आपल्याला दाखविता येतात. वाचनसंस्कृतीच्या संदर्भात आज ब-यापैकी उलट - सुलट चर्चा सुरु असतात. या चर्चेच्या अनेक बाजू आहेत. पण समाजातील लोकांचे वाचन सपशेल बंद झालेले आहे, असे म्हणणे धाडसाचे ठरेल. आजही मराठीतील आणि अन्य भाषेतील चांगल्या साहित्यकृती मोठया प्रमाणात वाचल्या जातात आणि या साहित्यकृतींना सर्व स्तरातून उत्तम प्रतिसाद मिळतो. म्हणजे एका अर्थाने भौतिक विकासाच्या गतीमध्ये देखील वाचन ही गोष्ट समाजाने दुर्लक्षित केलेली नाही. आज अनेक चांगल्या साहित्यकृतीच्या आधारे मराठी आणि अन्य भाषांमध्ये सिनेमा निर्मिती होत आहे, हे ही लक्षात घेण्यासारखे आहे. आपल्या समाजातील व्यवसायाने डॉक्टर, इंजिनिअर, वकील, उद्योजक असलेल्या व्यक्तींमध्ये वाचनाचे प्रमाण उल्लेखनीय स्वरूपाचे आहे आणि ही एका अर्थाने आनंदाची गोष्ट आहे.

मघाशी म्हंटल्याप्रमाणे भाषा ही साहित्याचे माध्यम आहे, हे खरे असले तरी, कोणती भाषा प्रमाणभाषा, कोणती शुध्द भाषा, असे जे प्रश्न निर्माण होतात, हे माझ्या दृष्टीने महत्वाचे नाही. भाषा ही कधीही शुध्द - अशुध्द नसते. मराठी भाषा ही अनेक बोलीभाषांनी समृध्द झालेली आहे. किंबहुना प्रमाण म्हटल्या जाणा-या मराठी भाषेने बोलीभाषेतून ब-यापैकी शब्दसंपत्ती मिळविली आहे आणि म्हणून प्रमाण म्हटली जाणारी भाषा ही समृध्द दिसते. महाराष्ट्रामध्ये विदर्भ, खानदेश, कोकण, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र या वेगवेगळया प्रदेशातून आलेल्या लेखकांची आपली बोली- भाषेतील निर्मिती पाहिली तर ती थेट हृदयाला भिडणारी अशी आहे. उध्दव शेळके, विठ्ठल वाघ, बहिणाबाई चौधरी, हमीद दलवाई, श्री. ना. पेंडसे, रा.रं.बोराडे, व्यंकटेश माडगूळकर अशी धावती नावे जरी आपण घेतलीत तरी त्यांच्या साहित्य कृतीतील बोलीभाषेतील सामर्थ्य आपल्या लक्षात आल्यावाचून रहात नाही, किंबहुना या लेखकांनी आपल्या बोलीभाषेतीलच साहित्यनिर्मिती केल्याने त्यांच्या जीवनानुभवाची पारदर्शी प्रामाणिकता, वाचकाच्या हृदयाला थेट येऊन भिडते. वाचकाला ही साहित्यकृती आपली वाटते. यातच या लेखकाचे आणि त्याच्या बोलीभाषेचे मोठेपण दडलेले आहे. म्हणून नवोदित मित्रांना मी असे आवाहन करतो की, भाषेच्या संदर्भात कोणताही किंतु किंवा न्यूनगंड न बाळगता आपण आपली अभिव्यक्ती आपल्या पध्दतीने आणि स्वाभाविकपणे केली पाहिजे. कोणतीही कृत्रिमता आपली मौलिकता हिरावून घेऊ शकते. मौलिकता ही आपण आपल्या माती इतकीच जपली पाहिजे. तुमचे साहित्य भाषिक, सामाजिक, सांस्कृतिक, परिप्रेक्ष्य घेऊन अवतरेल आणि तुमच्या जीवनाचे आणि समाजाचे प्रतिनिधित्व करेल, हेच साहित्य मौलिक असेल, असे मला वाटते.

मित्रहो, या संमेलनाच्या निमित्ताने मी आपल्याशी चर्चा केली आणि संवाद साधू शकलो, ही माझ्या दृष्टीने आनंदाची गोष्ट आहे. ही संधी मला उपलब्ध करुन दिली आणि अध्यक्षपदाचा सन्मान दिला, याबद्दल मी आयोजकांचे आणि आपल्या सर्वांचे मनःपूर्वक आभार मानतो.

धन्यवाद।